( MSSL Cri.MA(JC)01/2018 ) 9

# फौजदारी किरकोळ अर्ज १९/२०१८ (फलटण शहर गु. र. नं. २५०/२०१८) मधील मुद्देमाल परती अर्जावरील आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा अर्जदाराने सदर प्रकरणातील सोन्याची चेन त्यात तुळजाभवानी फोटो असलेले सोन्याचे पेंडल परत मिळण्यासाठी दाखल केलेला आहे. सदर अर्जाचे पुष्टयर्थ अर्जदाराने प्रतिज्ञापत्र देखील सादर केलेले आहे.

२. सदर अर्जावर तपासिक अंमलदार व सरकारी वकील यांनी म्हणणे सादर केले. दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकला. तपासिक अंमलदाराचे म्हणणे असे की, सदर जप्त मुद्देमालही अर्जादारास योग्य त्या अटी व शर्तीवर परत दयावे अशी त्यांनी विनंती केली. सदर जप्ती पंचनामा या प्रकरणात हजर केलेला आहे. सरकारी वकीलांनी तपासीक अंमलदाराच्या म्हणण्यास दुजोरा दिला.

३. सदर प्रकरणात अर्जदाराने आपल्या अर्जाच्या पुष्टयर्थ फलटण पोलीस स्टेशनचे जप्ती पंचनामा झेरॉक्स, अर्जदाराचे आधार कार्ड झेरॉक्स, एफ.आय.आर., अर्जदार यांची चेन खरेदी असलेली पावतीची स्थळप्रत इत्यादी कागद दाखल केली आहेत.

४. सदर अर्जाचा विचार करता, कागदपत्रावरुन सोन्याची चेन ही अर्जदाराची असल्याचे दिसून येते. सदर चेन पोलीसांच्या ताब्यात राहिल्यास तिच्या देखरेखी अभावी तिचे मुल्य कमी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याशिवाय अर्जदाराने सदर चेनवरील मालकी शाबीत केल्यामुळे सदर चेनचा ताबा अर्जदारास देणे योग्य वाटते. सबब, त्या संदर्भात मी खालील आदेश पारीत करत आहे.

## आदेश

.१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

.२. सदर प्रकरणातील जप्त मुद्देमाल सोन्याची चैन किमंत ७५,०००/-अडीच तोळे वजनाची हिचा ताबा अर्जदार बाबुराव आनंदराव जगदाळे यांना पडताळणी करून देण्यात यावा.

Godse 7/8/18

(अ.अ.गोडसे)
प्रमुख न्यायदंडाधिकारी, बाल न्यायमंडळ, सातारा.

सातारा
दि.-०७/०८/२०१८

AMKulkarni

(सौ.ए.एम.कुलकर्णी)
सदस्य, बाल न्यायमंडळ, सातारा.

(ॲड.सौ.एस.पी.काटकर/घोगरे)
सदस्य, बाल न्यायमंडळ, सातारा.